**संत तुकाराम वनग्राम योजना**

सुधारीत तरतुदी

**महाराष्ट्र शासन**

**महसूल व वन विभाग,**

शासन निर्णय क्रमांक : एफडीएम २००५/प्रक्र.३१३/फ-२

मंत्रालय,मुंबई- ४०००३२,

दिनांक:- १५.२.२००८

वाचा :- १. शासन निर्णय क्रमांक महसूल व वन विभाग क्रमांक एमएससी-२०००/प्रक्र.१४३/ फ-२, दि.२५.४.२००३

२. शासन निर्णय समक्रमांक दिनांक २३.११.२००६

**प्रस्तावना :-**

राज्यामधील संयुक्त वनव्यवस्थापन समित्यांना प्रोत्साहन देण्यासाठी संदर्भाधीन शासन निर्णय दिनांक २३.११.२००६ अन्वये ''संत तुकाराम वनग्राम योजना'' ची सुरुवात करण्यात आली असून या योजनेस राज्यामधून मोठया प्रमाणावर प्रतिसाद मिळत आहे. आता शासनाने या योजनेच्या दिनांक २३.११.२००६ च्या शासन निर्णयामध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्याचा निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय :-**

**१.मराठवाडा प्रशासकीय विभागासाठी प्रोत्साहनात्मक बक्षीस** :-

मराठवाडा प्रशासकीय विभागामध्ये वनक्षेत्राचे प्रमाण अल्प असल्याने या क्षेत्रातील संयुक्त वन व्यवस्थापन समित्यांना/गावांना वनसंवर्धनाच्या कामामध्ये सहभागी करुन घेण्याच्या दृष्टीने या क्षेत्रातील उत्कृष्ट संयुक्त वन व्यवस्थापन समितीस/गावास रु.१.५१ लक्ष रकमेचे प्रोत्साहनात्मक बक्षीस प्रदान करण्यात येईल. त्यासाठी समित्यांचे/गावांचे वनक्षेत्रावरील तसेच वनेतर क्षेत्रावरील/सामाजिक वनीकरण कार्यक्रमामधील कार्याचेही मुल्यमापन विचारात घेतले जाईल.

**२. जिल्हा स्तरावरील निवड समितीमध्ये बदल** :-

यापूर्वीच्या दिनांक २३.११.२००६ च्या शासन निर्णयानुसार जिल्हा स्तरावरील निवड समितीमध्ये सामाजिक वनीकरण विभागाचे प्रतिनिधी सहसंचालक सामाजिक वनीकरण विभाग यांचा सदस्य म्हणून समावेश करण्यात आला होता. त्याऐवजी आता संबंधित जिल्हयातील उपसंचालक, सामाजिक वनीकरण विभाग हे जिल्हास्तरीय निवडसमितीचे सदस्य राहतील.

या व्यतीरिक्त इतर तरतुदी शासन निर्णय दिनांक २३.११.२००६ प्रमाणेच राहतील.

सदर शासन निर्णय नियोजन विभागास दाखवून व वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक ९/०८/व्यय-१०, दिनांक ५.२.२००८ अन्वये प्राप्त झालेल्या सहमतीस अनुलक्षून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने.

(नितीन काकोडकर)
सहसचिव
महसूल व वन विभाग

**प्रति-**

१) मा.राज्यपाल यांचे सचिव
२) मा.मुख्यमंत्र्याचे सचिव
३) मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव
४) सर्व मा.मंत्री,मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
५) मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन
६) महाराष्ट्र शासनाच्या सर्व संबंधीत प्रशासकीय विभागांचे अ.मु.स/प्रधान सचिव/सचिव
७) प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य,नागपूर
८) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) महाराष्ट्र राज्य,नागपूर
९) संचालक,सामाजिक वनीकरण,महाराष्ट्र राज्य,पुणे
१०) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (सर्व)
११) मुख्य वनसंरक्षक (सर्व)/वनसंरक्षक (सर्व)
१२) सर्व विभागीय आयुक्त
१३) सर्व सहसंचालक, सामाजिक वनीकरण संचालनालय
१४) सर्व उपसंचालक, सामाजिक वनीकरण संचालनालय
१५) जिल्हाधिकारी (सर्व)
१६) मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद (सर्व)
१७) पोलीस अधिक्षक (सर्व)
१८) प्रकल्प अधिकारी ,जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा (सर्व)
१९) उपवनसंरक्षक/विभागीय वन अधिकारी (सर्व)
(त्यांना विनंती करण्यात येते की, सदर शासन निर्णयाच्या छायाप्रती यांच्या कार्यक्षेत्रातील संयुक्त वनव्यवस्थापन समित्या/ग्रामपंचायती यांना उपलब्ध करुन देण्यात याव्यात)
२०) उपविभागीय अधिकारी (महसूल) सर्व
२१) जिल्हा विकास अधिकारी (सर्व),जिल्हा कृषी अधिकारी/मृदसंधारण अधिकारी (सर्व)
२२) सर्व कार्यासन अधिकारी अधिकारी,महसूल व वनविभाग
२३) निवडनस्ती,फ-२ कार्यासन, महसूल व वन विभाग,मंत्रालय,मुंबई-३२